# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड</u>

रेल्वेस्टेशन रोड, नांदेड– ४३१ ६०१, ई–मेल आयडी mahnandc@mhstate.nic.in
फोन नं. ०२४६२–२३४५५५

**गट–'ड' पदांची कामे कंत्राटदारा मार्फत (आऊटसोर्सिंग) करुन घेण्यासाठीची जाहिर निविदा**

## <u>शिपाई पदासाठी बाहययंत्रणेद्वारे निविदा – २०२४</u>

नांदेड न्यायिक जिल्हयाच्या आस्थापनेवर जिल्हा न्यायालय–१, मुखेड येथे निविदेमध्ये नमूद केलेल्या गट–'ड' चतुर्थ श्रेणी पदांची कामे दोन वर्ष कालावधी करीता शासनमान्य कंत्राटदारा मार्फत (आऊटसोर्सिंग) करुन घेण्यासाठी जाहीर निविदा सिलबंध स्वरुपात मागविण्यात येत असून सदरील निविदेचा नमुना, सविस्तर तपशिल, अटी व शर्ती http:www.court.mah.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून जिल्हा न्यायालय, नांदेड यांच्या सूचना फलकावर पहावयास मिळतील.

तरी इच्छूक शासनमान्य कंत्राटदारांनी सदर निविदेमधील अटी व शर्तींना बांधील राहून आपल्या निविदा विहित नमुन्यात मोहोरबंद लखोटयात भरुन त्या लखोटयावर अगदी वरच्या भागावर मोठया अक्षरात शिपाई पदासाठी बाहययंत्रणेद्वारे निविदा–२०२४ असे लिहून प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड असे लिहून यांच्याकडे दिनांक ०६/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ०६:०० वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. सदर प्राप्त झालेल्या निविदा हया न्यायालयाच्या संबंधीत समितीद्वारे निविदाधारक अथवा त्यांच्या प्रतिनिधीसमोर दिनांक ०८/०४ /२०२४ रोजी दुपारी ०२:०० वाजता उघडण्यात येतील व त्यातून कमीत कमी रक्कमेची निविदा संबंधीत समितीस योग्य वाटल्यास स्वीकारण्यात येईल. याबाबतीत निविदा स्वीकृत करण्याचा अथवा रद्द करण्यांचा अंतिम अधिकार प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड यांचा राहील.

Skosamk

दिनांक : ०६/०३/२०२४

(सुरेखा कोसमकर)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड

रेल्वेस्टेशन रोड, नांदेड – ४३१ ६०१, ई–मेल आयडी mahnandc@mhstate.nic.in
फोन नं. ०२४६२–२३४५५५


## गट–'ड' पदांची (शिपाई Peon) कामे कंत्राटदारा मार्फत (आऊटसोर्सिंग) करुन घेण्यासाठीची जाहिर निविदा

### शिपाई पदासाठी बाहययंत्रणेद्वारे निविदा – २०२४

**कामाचे स्वरुप –**

| अ.क्र. | पदाचे नाव | आवश्यक संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | शिपाई (Peon) | ०२ | जिल्हा न्यायालय–१, मुखेड येथील न्यायदालन, न्यायाधीश यांचे निजीकक्ष तसेच न्यायालयीन विभागाची स्वच्छता राखणे, पुकारा करणे, संचिका तसेच इतर शासकीय टपालांची देवाण–घेवाण करणे इत्यादी. |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे –**

| अ.क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १ | कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी शिपायांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्याचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| २ | शासन मान्य कंत्राटदाराने कंत्राटी शिपायांना कामाचे वेतन व त्यानुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता, संबंधीत कंत्राटी शिपायाच्या नावाने Account payee Cross cheque द्वारेच (रेखांकित धनादेशाद्वारेच) अदा करावेत. |
| ३ | कंत्राटदाराने कंत्राटी शिपायाला दिलेल्या धनादेशाची (चेकची) छायांकित प्रत, सदर धनादेश स्वीकारल्याची कंत्राटी शिपायाची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्याच्यावर सदर धनादेश क्रमांक लिहिलेला असेल), कंत्राटदाराने दरमहा या कार्यालयास सादर करावे. जो पर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाही तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही. |
| ४ | कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही. |
| ५ | किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी शिपायास भरपगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुटीच्या दिवशी कार्यालयास कंत्राटी सेवेची आवश्यकता भासल्यास त्याचेऐवजी दुसरा शिपाई उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल. |
| ६ | सुट्टीच्या दिवशी कंत्राटी शिपायाकडून काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देतांना त्या दिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून दुसऱ्या कर्मचाऱ्याची सोय करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल. |

| | |
|---|---|
| ७ | कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी शिपायांना कार्यालयात हजर होताना व कार्यालय सोडताना बायोमॅट्रीक प्रणालीवर आणि / अथवा नोंदवहीवर त्याची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल. सदर नोंदणीसाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे. |
| ८ | कंत्राटदारास, त्याने नेमलेल्या कंत्राटी शिपाई यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तदतुदीनुसार वेतन, महागाई भत्ते, व सवलती लागू करणे बंधनकारक असेल. |
| ९ | ज्या कंपनीस/ संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्याबाबतच्या अटी व शर्तीनुसार करार करणे आवश्यक राहील. |
| १० | कंपनी/संस्थेमार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा या न्यायालयावर राहणार नाही. |
| ११ | सदरील निविदेस शासनाकडून प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर अंमलात येईल. |
| १२ | कंत्राटदारामार्फत दिल्या जाणाऱ्या वरील सेवा /सुविधा ईत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. |
| १३ | न्यायालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणाऱ्या सोईसुविधा / काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने लागु असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत. |
| १४ | उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे नियम, अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगीक लाभ अनुज्ञेय/लागू राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे न्यायालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. |
| १५ | जर न्यायालयातील कोणतीही वस्तू/ संचिका चोरी / गहाळ झाली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कंत्राटदारावर राहील. तसेच त्याबाबतच्या परिणामांची जबाबदारी कंत्राटदार शिपाई यांचेवर राहील. |
| १६ | शासनमान्य कंत्राटदारांनीच निविदा सादर कराव्यात. कंत्राटदारांना त्यांनी शासनाकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्राची सांक्षाकित छायाप्रत निविदे सोबत सादर करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे आयकर विवरणपत्र भरले बाबत मागील तीन वर्षाच्या सांक्षांकित छायाप्रत, पॅनकार्ड, आधारकार्ड, रहिवासाचा पत्ता इ. बाबतचे कागदपत्रांच्या सांक्षांकित छायाप्रती देखील निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. सदर सर्व कागदपत्रांच्या छायाप्रतींसोबत त्यांच्या मुळ प्रती तपासणीसाठी सादर करणे कंत्राटदारावर बंधनकारक आहे. |
| १७ | कंत्राटदारास (१) विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि २५१२ / प्र.क्र. १५७ /का–१२, मंत्रालय, मुंबई दिनांक २७/०१/२०१५ (२) विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी २०१६ / प्र.क्र. १९४ /का–१२, मंत्रालय, मुंबई दिनांक २३/०२/२०१७ त्याचप्रमाणे (३) विधी व न्याय विभाग शासन परिपत्रक क्रमांक : पदनि २०१६/प्र.क्र. २९/१६/वित्तीय सुधारणा–१, मंत्रालय, मुंबई दिनांक ०२/०८/२०१६ व विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्रमांक : कंत्राटी २०१६ / प्र.क्र. १९४ /का–१२ मंत्रालय, मुंबई दिनांक ०९/०८/२०१७ या सर्वांमधील अटींचे व शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| १८ | शासकिय वेळेनंतर कंत्राटी शिपायांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास, त्यांना अतिकालिक भत्ता (ओव्हरटाईम) देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल. कंत्राटदाराने अतिकालीक भत्याचे खर्च वेगळा दाखवावा. दर तासाला किती अतिकालीक भत्त्याची मागणी करणार आहे त्याबाबत कंत्राटदाराने लेखी स्वरुपात प्रपत्र क्र. २ मध्ये सादर करावे. |
| १९ | कंत्राटदारांना निविदेसोबत आवश्यक ती फि/अनामत रक्कम शासकीय नियमाप्रमाणे कार्यालयात जमा करावी लागेल. |

दिनांक :०६/ ०३/ २०२४

(सुरेखा कोसमकर)
प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

# निविदेचा नमुना

| | | |
|---|---|---|
| निविदा मागविणाऱ्या कार्यालयाचे नाव | : | जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड, रेल्वे स्टेशन रोड, नांदेड – ४३१ ६०१. |
| कामाचे स्वरुप | : | जिल्हा न्यायालय–१, मुखेड येथील न्यायदालन, न्यायाधीश यांचे निजीकक्ष तसेच न्यायालयीन विभागाची स्वच्छता राखणे, पुकारा करणे, संचिका तसेच इतर शासकीय टपालांची देवाण–घेवाण करणे इत्यादी. |

| | | |
|---|---|---|
| निविदा क्रमांक | : | —— |
| कंत्राटादाराचे /संस्थेचे / कंपनीचे नाव | : | |
| कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा संपूर्ण पत्ता | : | |
| कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा संपर्क क्रमांक दूरध्वनी | : | |
| कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा नोंदणी क्रमांक | : | |
| कंत्राटदाराचा / संस्थेचा / कंपनीचा सेवा कर क्रमांक | : | |

## प्रपत्र – १

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | मागणी करण्यात आलेली कर्मचारी संख्या | मागणी केलेल्या पदांसाठी कंत्राटी सेवा पुरविण्यासाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण रक्कम (वार्षिक खर्च) | साधनसामुग्री खर्च (असल्यास) रुपये (वार्षिक खर्च) | सेवा कर (वार्षिक खर्च) | एकूण रक्कम (रुपये) (स्तंभ ४+५+६) | एकूण रक्कम (रुपये) अक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | शिपाई | ०२ | | | | | |
| | एकुण | | | | | | |

निविदेची एकुण रक्कम रू. ......................... + 18 % GST अक्षरी रूपये.................................

## प्रपत्र – २

कंत्राटदाराकडून मागणी करण्यात आलेला अतिकालीक भत्ता

| अ.क्र. | पदे | अतिकालीक भत्त्यांची रक्कम (प्रतितास) |
|---|---|---|
| १ | शिपाई | |
| | एकुण | |

————————